# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.03.2024** **वार-शुक्रवार**

---

**कॉंग्रेस**

लोकसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेसनं काल 57 उमेदवारांची यादी जाहीर केली; त्यात महाराष्ट्रातून सात जणांच्या नावांचा समावेश आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून रविंद्र धंगेकर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीतर्फे या आधीच पुण्यातून मुरलीधर मोहोळ यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**भारतीय जनविकास आघाडी**

भारतीय जनविकास आघाडी महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्व 48 जागा लढवणार असून आज 32 उमेदवारांची घोषणा करण्यात आली. तसंच मनोज जरांगे पाटील यांना लोकसभा निवडणुकीत उतरायचं असेल तर आम्ही उमेदवारी देणार असल्याचंही आघाडीचे नेते हेमंत पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं.

**लोकशाही दिन**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या आचार संहितेच्या कालावधीत म्हणजे एप्रिल आणि मे महिन्यात पुणे विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यात विभागीय लोकशाही दिनाचं आयोजन केलं जाणार नाही. विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त वर्षा लड्डा यांनी आज ही माहिती दिली आहे.

**आयुक्त**

पुणे शहरात पावसाळापूर्व कामे करण्यासाठी आचारसंहितेची कोणतीही अडचण नाही. अत्यावश्यक कामांची यादी निवडणूक आयोगाला पाठवल्यास त्यांची समिती छाननी करून परवानगी देऊ शकते, असं पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

**सिमीबंदी**

बेकायदेशीर कृत्ये अधिनियमानुसार सिमी या संघटनेवर बंदी घालण्यात आली आहे. याविषयी केंद्र सरकारनं यापूर्वीच अधिसूचना जारी केली आहे. पुढील 5 वर्षांसाठी ही बंदी असणार आहे. याविषयी राज्य शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवलं आहे. या कायद्याच्या तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी. तसंच संबंधितांवर न्यायाधिकरणाची नोटीस बजावण्याबाबतची कार्यवाही करण्याचे आदेश शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

**सायकल**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने दर गुरूवारी सायकलवरून कामावर अर्थात 'सायकल टू वर्क थर्सडे' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. काल या उपक्रमात नागरिकांनी तसंच महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यानी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला होता. दुचाकी आणि चारचाकी वाहनांची रस्त्यांवरील वाढती संख्या आणि प्रदूषणात, तापमानात होणारी वाढ लक्षात घेता महापालिकेतर्फे हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाला व्यापक रुप देण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे, असं आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

**<u>महापालिका</u>**

पुणे महापालिकेत राज्य सरकारकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या उपायुक्त चेतना केरूरे, संतोष वारुळे आणि आशा राऊत यांची बदली झाली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्य सरकारने अनेक महत्त्वपूर्ण पदांवरील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. जिल्ह्यामध्ये तीन वर्षापेक्षा अधिक कार्यकाळ झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहे. राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने याबाबतचे आदेश काढले आहेत.

**<u>जलदिन</u>**

22 मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून साजरा केला जातो. पाण्याच्या बचतीबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघानं 1992 मध्ये झालेल्या अधिवेशनात 22 मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. या निमित्तानं पुण्यात विविध ठिकाणी आज कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. यशस्वी एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या चिंचवड इथल्या 'यशस्वी' भवनात पाण्याचं, जलस्रोतांचं महत्व आणि व्यवस्थापन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आलं. पाणी बचतीचा निर्धार पक्का करण्यासाठी विद्यार्थ्यांना पाणी बचतीची सामूहिक शपथ देण्यात आली.

**<u>आर्थिक आवाहन</u>**

ग्रामीण भागातून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या गरजू आणि होतकरू मुलींसाठी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने पुण्यात वसतिगृह उभारण्यात येत आहे. 336 मुलींच्या निवासाची सोय असणाऱ्या या वसतिगृहाच्या उभारणीसाठी आर्थिक मदत करावी असं आवाहन समितीनं केलं आहे.

**<u>वीजखंडित</u>**

महावितरण च्या पुणे परिमंडळातील वीज बिलांच्या थकबाकी वसुलीसाठीची कारवाई अधिक तीव्र करण्यात आली असून गेल्या 20 दिवसांत, सुमारे 19 हजार थकबाकीदार वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. दररोज सरासरी 900 थकबाकीदार वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित केला जात आहे. पुणे परिमंडळात महावितरणची सुमारे सव्वाशे कोटी रुपयांच्या वीज बिलांची थकबाकी आहे.

**<u>निधन</u>**

चिंचवडमधील ज्येष्ठ पत्रकार मदन जोशी यांचं आज अल्पशा आजाराने निधन झालं; ते 67 वर्षांचे होते. विविध दैनिकं, साप्ताहिकं आणि मासिकांमध्ये चाळीस वर्षाहून अधिक काळ त्यांनी छायाचित्रण आणि पत्रकारिता केली.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज 37 अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली. उद्याही कमाल तापाम्न साधारण 37 अंशांच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**